# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५१/२०११-१२/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. आप्पासो वसंतराव घोरपडे,<br>मु.पो. कोत्येनबोबलाद, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आप्पासो वसंतराव घोरपडे, मु.पो. कोत्येनबोबलाद, ता.जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ३१४ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १९.७.२०११ रोजी अर्ज केला. या अर्जास वितरण वाहिनीचा विस्तार असलेने दि. १८.८.२०११ पर्यंत कृती मानके विनियमानुसार मंजुरी व भरावयाचे चलन मिळावयास हवे होते. हे चलन तक्रारदारास दि. ३१.१०.२०११ रोजी मिळालेले आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १३.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. ११.११.२०११ रोजी आदेश झाले त्यामध्ये एस.ओ.पी.च्या कालावधीत चलन द्यावे अन्यथा विलंबापोटी भरपाई द्यावी असे आदेश झाले. मंचाकडून अपेक्षित मदत - दि. १८.८.२०११ ते ३१.१०.२०११ या चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मिळावी, जादा रोहित्र मंजूर असलेने वीज पुरवठा मिळण्यास कालावधी लागणार असलेने ही भरपाई रोख स्वरुपात मिळावी.

वितरण कंपनीने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाचा नवीन शेतीपंपासाठी दि. १९.७.२०११ रोजी अर्ज प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे. त्यांना दि. ३१.१०.२०११ रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराचे एकूण १.०८ कि.मी. उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनी सर्व्हीस कनेक्शन, एक ६३ केव्हीए क्षमतेचा रोहित्र मंजूर आहे. तक्रारदाराने चलन भरलेनंतर व चाचणी अहवाला सादर लि‍े नंतर रोहित्र उभारणीचे काम विहीत मुदतीत करुन देण्यात येईल असे नमूद केले आहे. संख उप विभागात कर्मचारी संख्या अपुरी आहे, त्याचप्रमाणे दुरुस्तीची कामे, वीज बील वसुली व इतर कामामुळे चलन देण्यात विलंब झाला आहे. ही बाब लक्षात घेवून तक्रारदाराने मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले. ग्राहकाचे काम पूर्ण करुन विद्युत पुरवठा देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. तक्रारदारास वितरण वाहिनीचा विस्तार असलेने १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते, ते विलंबाने दिल्याबद्दल कुठलाही खुलासा केला नाही. संख उप विभागात कर्मचारी संख्या अपुरी आहे, त्याचप्रमाणे दुरुस्तीची कामे, वीज बील वसुली व इतर कामामुळे चलन देण्यात विलंब झाला आहे, या कथनावरुन विलंबाबद्दल भरपाई देण्याची जबाबदारी वि.प.चे स्थानिक अधिकारी टाळू शकत नाहीत, कारण कृती मानके विनियमानुसार वाहिनी विस्तार असलेने १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते. वि.प.ने त्यामुळे ग्राहकाची चलन देण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाईची मागणी मंजूर करणे योग्य होईल. परंतु विनियमानुसार अशी भरपाईची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्याची असलेली तरतूद दुर्लक्षित करता येणार नाही असे मंचाचे मत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी दि. १८.८.२०११ ते दि. ३१.१०.२०११ या कालावधीतील ११ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ११००/- तक्रारदार ग्राहकास भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरीत रक्कम रोखीने ग्राहकास द्यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

३) ग्राहकाची मागणी जादा रोहित्राची उभारणी असल्याने कालावधी लागणार असल्याने भरपाईची रक्कम रोखीने मिळावी ही मागणी फेटाळण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com